# अहिल्यानगर महानगरपालिका
## पाणी पुरवठा विभाग

वेबसाईट : www.amc.gov.in
ई-मेल : amc_anr@rediffmail.com

जा.नं. शहर पा.पु.४३० दिनांक :- ०७/०७/२०२५

प्रति,
मा. प्रसिध्दी विभाग प्रमुख,
अहमदनगर महानगरपालिका

विषय- वीज वितरण कंपनी कडून शहर पाणी पुरवठा योजनेवरील विद्युत पुरवठा सातत्याने खंडीत होत असल्याने शहराचा पाणी पुरवठा विस्कळीत होत असले बाबत.

महोदय,

विषयांकीत बाबत कळविण्यांत येते की, अहमदनगर शहर पाणी पुरवठा योजनेवरील महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीकडून होणारा वीज पुरवठयामध्ये तांत्रिक बिघाड निर्माण होवून वारंवार खंडीत होत असल्याने शहराचा पाणी पुरवठा विस्कळीत होत आहे.

(दिनांक १८/०६/२०२५ ते दिनांक ०६/०७/२०२५ दरम्यान पाणी पुरवठा योजनेचा महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडून खंडीत वीज पुरवठयाचा तपशील खालील प्रमाणे. )

| अ.क्र. | दिनांक | खंडीत वीज पुरवठया बाबतचा तपशिल |
|---|---|---|
| १ | १८/०६/२०२५ | दुपारी ०४.०० ते सायंकाळी ०४.१५ पर्यंत |
| २ | २०/०६/२०२५ | दुपारी ३.२५ ते सायंकाळी ३.३५ पर्यंत |
| ३ | २२/०६/२०२५ | दुपारी ०४.५० ते सायंकाळी ०४.५५ पर्यंत |
| ४ | २३/०६/२०२५ | सायंकाळी ६.१५ ते सायंकाळी ०६.२५ पर्यंत |
| ५ | २७/०६/२०२५ | दुपारी १२.१५ ते दुपारी १२.२५ पर्यंत |
| ६ | २८/०६/२०२५ | रात्री १२.१५ ते रात्री १२.४५ पर्यंत |
| ७ | ०१/०७/२०२५ | सायंकाळी ५.०० ते सायंकाळी ५.०५ पर्यंत |
| ८ | ०१/०७/२०२५ | सायंकाळी ६.०५ ते सायंकाळी ०६.१० पर्यंत |
| ९ | ०४/०७/२०२५ | दुपारी ०१.३० ते दुपारी २.०० पर्यंत |
| १० | ०५/०७/२०२५ | दुपारी ०१.४५ ते दुपारी १.५५ पर्यंत |
| ११ | ०५/०७/२०२५ | सायंकाळी ५.२० ते सायंकाळी ५.३० पर्यंत |
| १२ | ०६/०७/२०२५ | सकाळी १०.१० ते सकाळी १०.१५ पर्यंत |
| १३ | ०६/०७/२०२५ | दुपारी ०१.४३० ते दुपारी १२.४५पर्यंत |

Scanned with OKEN Scanner

वीज पुरवठा काही मिनीटे जरी खंडीत झाला तरी मुळानगर, विळद व नागापूर येथील कार्यरत पंपीग स्टेशन येथून पाणी उपसा सुरळीत होण्यास सुमारे दोन ते तीन तासाचा अवधी लागतो. त्यामुळे अनियमीत पाणी उपसा होवून शहरातील वितरणासाठीच्या टाक्या वेळेत भरता येत नाहीत. पर्यायाने शहरास नियमीत व पूर्ण दाबाने पाणी पुरवठा करण्यास अडचणी निर्माण होत आहेत.

मागील १५ दिवसांपासून शहर पाणी पुरवठा योजनेचा वीज पुरवठा सातत्याने खंडीत होत असल्याने शहराचा मध्यवर्ती भागासह सर्व उपनगर भागास निर्धारित वेळेत व पूर्ण दाबाने पाणी पुरवठा करणेस सातत्याने अडथळे निर्माण होत आहेत.

तसेच खंडित वीज पुरवठयामुळे शहराचा पाणी पुरवठा विस्कळीत होत असल्याने याबाबत वीज वितरण कंपनीचे मा.अधिक्षक अभियंता, मा.कार्यकारी अभियंता यांना मा.आयुक्त तथा प्रशासक, अहमदनगर महानगरपालिका यांचे स्तरावर पत्र देउन शहर पाणी पुरवठा योजनेकरीताचा वीज पुरवठा सुरळीत ठेवण्याच्या दृष्टीकोनातून कार्यवाही/ उपाय योजना बाबत कळविण्यात आलेले आहे. परंतू काही दिवसापासून सातत्याने वीज पुरवठा खंडित होण्याची मालिका सुरूच आहे.

तरी नागरीकांनी याची नोंद घेवून असलेल्या पाण्याचा वापर काटकसरीने करून महानगरपालिकेस सहकार्य करावे. अशा प्रकारची प्रेस नोट वर्तमानपत्रात प्रसिध्द करावी ही विनंती.

जल अभियंता
अहमदनगर महानगरपालिका

प्रत : मा.आयुक्त तथा प्रशासक, अहमदनगर महानगरपालिका यांचे माहितीस्तव सविनय सादर

Scanned with OKEN Scanner